**<u>प्रतिवादी क्र. १० तर्फे उलटतपास श्री. यू. जी. परुळेकर वकील यांचे मार्फत.</u>**

**३५.** आमची शिरसंगी या गावात स्वतःची कोणतीही मिळकत नाही. मी वादीने ज्या कागदपत्रांच्या आधारे हा दावा दाखल केला आहे ती कागदपत्रे पाहिलेली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ३१६ च्या सातबारा उता-यावरती मागील ३५ ते ४० वर्षांपासून प्रतिवादी क्र. १० चे मालकी हक्कात नाव आहे. वादीने दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये प्रतिवादी क्र. १० च्या नावाची नोंद आहे. वादीने गट क्र. ३१६ मधील प्रतिवादी क्र. १० चे नाव पोकळ व बनावट असल्याबाबत वेगळे प्रकरण चालविलेले नाही.

**३६.** मला प्रतिवादी क्र. १० त्याच्या ताब्यात असलेल्या क्षेत्रामध्ये ऊस व भाताचे पिक घेत असल्याबाबत माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १० चा गट क्र. ३१६ मधील ०.२९ क्षेत्र वगळता उरलेल्या क्षेत्रासहित गट क्र. ३१५ मधील क्षेत्राशी कोणताही संबंध नाही. मला प्रतिवादी क्र. १० कडे किती क्षेत्र जास्त आहे याबाबत सांगता येणार नाही.

**३७.** हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी क्र. १० च्या मालकी व ताब्यातील क्षेत्राशी कोणताही संबंध नसताना वादीच्या वतीने खोटे वटमुखत्यापत्र दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by
RAVI PANDURANG
THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक - ०६.०८.२०२४.

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.